सद्रक्षणाय खलनिग्रहणाय्

महाराष्ट्र शासन
**पोलीस विभाग**
पोलीस उपआयुक्त (अभियान)
पोलीस आयुक्त यांचे कार्यालय,
डॉ. डी.एन. रोड, मुंबई-४००००१
दूरध्वनी क्र. ०२२-२२६६५८१८.
Email:- cp.mum.dcpops@mahapolice.gov.in

---

दिनांक :- २०/०४/२०२६

## प्रेस नोट

## ३६ वी महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा, मुंबई २०२६

दिनांक २०/०४/२०२६ ते दिनांक २७/०४/२०२६ दरम्यान बृहन्मुंबई पोलीस आयुक्तालय अंतर्गत ३६वी. महाराष्ट्र राज्य पोलीस क्रीडा स्पर्धा २०२६ आयोजित करण्यात आली आहे.

सदर स्पर्धेमध्ये ॲथलेटिक्स, फुटबॉल, व्हॉलीबॉल, हॅण्डबॉल, बास्केटबॉल, खो-खो, कबड्डी, तायक्वांदो, वु-शु, ज्युदो, कुस्ती, बॉक्सींग, हॉकी, वेटलिफ्टींग, पॉवरलिफ्टींग, बॉडीबिल्डिंग, क्रॉसकंट्री व जलतरण अशा १८ क्रीडा प्रकारांचा समावेश आहे. स्पर्धेकरीता राज्यातील विविध पोलीस घटकांमधून सुमारे ३७०० (पुरुष व महिला) खेळाडू, पंच व इतर सहभागी होणार आहेत. सदरची स्पर्धा मुंबईमधील पोलीस मुख्यालय कोळे कल्याण कलीना , सशस्त्र पोलीस मरोळ, मुंबई विद्यापीठ संकुल कलीना, अंधेरी स्पोर्टस् कॉम्प्लेक्स, मुंबई हॉकी असोसिएशन(एम.एच.ए) चर्चगेट येथील मैदानांवर आयोजित करण्यात आली आहे. तसेच दिनांक २६/०४/२०२६ रोजी वरिष्ठ पोलीस अधिकारी शुटींग स्पर्धा एस.आर.पी.एफ गट क्र-८ , गोरेगाव येथील फोर्स वन शूटिंग रेंज या ठिकाणी आयोजित केली आहे.

सदर स्पर्धेचे थेट प्रक्षेपण बृहन्मुंबई पोलीस दलाच्या @MumbaiPoliceYoutube या अधिकृत युटयुब चॅनेल वर उपलब्ध होणार आहे. तसेच स्पर्धेचे वेळापत्रक, निकाल, छायाचित्रे, स्पर्धकांची राहण्याची जेवणाची व्यवस्था, इ. तत्सम बाबी याची माहिती **MSPG** या मोबाईल ॲपवर उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

सदर स्पर्धेचा उद्घाटन समारंभ सशस्त्र पोलीस कोळे कल्याण, कलीना, सांताक्रुझ पुर्व, मुंबई येथील मैदानावर दिनांक २४/०४/२०२६ रोजी **१७.०० वा. महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री, मा. श्री. एकनाथजी शिंदे** यांच्या हस्ते होणार आहे. तसेच स्पर्धेचा समारोप समारंभ सशस्त्र पोलीस कोळे कल्याण, कलीना, सांताक्रुझ पुर्व, मुंबई येथील मैदानावर दिनांक **२७/०४/२०२६ रोजी १६.१५ वाजता महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री मा. श्री. देवेंद्रजी फडणवीस** यांच्या हस्ते होणार आहे. सदर वेळी महाराष्ट्र राज्य पोलीस दलाचे प्रमुख पोलीस महासंचालक मा. श्री. सदानंद दाते तसेच इतर वरीष्ठ अधिकारी व मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

तरी, सर्व पत्रकार बंधु-भगिनींना सदर स्पर्धेचे छायाचित्रण व वृत्तांकन करण्यासाठी निमंत्रित करण्यात येत आहे.

***